# महाराष्ट्रातील कीर्तन परंपरेचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

संशोधक विद्यार्थी – बालाजी रामभाऊ दिवटे
मार्गदर्शक – प्रा.डॉ.संजय भास्कर कदम सर
संशोधन केंद्र – पद्मश्री विखे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय प्रवरानगर ता.राहाता

## प्रस्तावना

गेल्या अनेक शतकांपासून महाराष्ट्राच्या धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक जडणघडणीत कीर्तनपरंपरेचे मोलाचे योगदान आहे. कीर्तनाच्या माध्यमातून विविध साधुसंतांनी, समाजप्रबोधकांनी मौखिक पद्धतीने समाजाचे प्रबोधन करून समाजावर उत्तम जीवनमूल्यांचे संस्कार केले आहेत. ग्रामीण महाराष्ट्रातील खेडे, सार्वजनिक ठिकाणे, देवळे या ठिकाणी धार्मिक उद्देशाने अशी कीर्तने होत आली आहेत. कीर्तन ही एक प्राचीन परंपरा आहे. संत नामदेव, संत तुकाराम यांपासून सुरू झालेल्या कीर्तन परंपरेचा वारसा आधुनिक महाराष्ट्रातील विविध साधुसंत, समाज प्रबोधनकार यांनी यशस्वीपणे पुढे सुरू ठेवला आहे. कीर्तन हे केवळ धार्मिक नाही तर ते मनोरंजक देखील असते. यातून लोकांना आनंद मिळतो आणि त्यांचे प्रबोधनही होते.कीर्तन या लोककलेचा ग्रामीण समाजावर ज्याप्रमाणे नैतिक परिणाम झाला, त्याचबरोबर कीर्तन परंपरेमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेवर अनेक प्रकारे खोलवर परिणाम झालेला दिसून येतो. कीर्तनामुळे ग्रामीण भागातील कलाकारांना आणि संबंधित व्यावसायिकांना उत्पन्नाचे साधन मिळते. कीर्तनकार, गायक, वादक (तबला, हार्मोनियम) आणि इतर सहाय्यक कलाकारांना त्यांच्या कलेतून पैसे मिळतात. त्यांची आर्थिक स्थिती सुधारते. या कलाकारांना उत्पन्नाचे साधन प्राप्त होते.

याशिवाय कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागात तात्पुरत्या स्वरूपात रोजगार निर्मिती होते. मंडप उभा करणारे,ध्वनीव्यवस्था करणारे, खाद्यपदार्थ विक्रेते आणि महाप्रसाद बनवणारे आचारी व त्यांचे कामगार, वाहतूकदार यांना काम मिळते. कीर्तनाचे कार्यक्रम ऐकण्यासाठी दूरवरून श्रोते येतात ज्यामुळे स्थानिक दुकाने, हॉटेल्स, वाहतूक सेवा देणारे वाहतूकदार यांना आर्थिक फायदा होतो. यामुळे ग्रामीण भागातील तरुणांना उद्योग प्राप्त होतो. लहान उद्योगांना चालना मिळते आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला गती मिळते.कीर्तनामुळे धार्मिक पर्यटन वाढते कारण अनेक लोक विशिष्ट कीर्तनकारांना ऐकण्यासाठी किंवा धार्मिक स्थळांना भेट देण्यासाठी प्रवास करतात यामुळे ग्रामीण भागातील पर्यटन उद्योगांना चालना मिळते. स्थानिक लोकांना रोजगार मिळतो.थोडक्यात कीर्तन ही केवळ कला नसून ती ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे जे रोजगारनिर्मिती, स्थानिक व्यवसायांना चालना आणि धार्मिक पर्यटनाला प्रोत्साहन देऊन ग्रामीण समाजाच्या आर्थिक विकासात विशेष योगदान देते. कीर्तनाचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम अभ्यासणे हा या शोधनिबंधाचा महत्त्वाचा हेतू आहे. कीर्तनाचा ग्रामीण भागातील उद्योगांवर, रोजगारांवर, कामगारांवर कशा रीतीने प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम होतो या दृष्टीने हा शोधनिबंध महत्त्वाचा ठरेल.

## गृहीतके

१. कीर्तन ही लोककला महाराष्ट्रातील शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात जास्त लोकप्रिय झालेली दिसून येते.

२. कीर्तन या लोककलेच्या माध्यमातून समाजात रोजगार निर्मिती झालेली आहे.

३. कीर्तनकाराबरोबरच इतर व्यवसायिकांनाही कीर्तनाच्या आयोजनातून रोजगार प्राप्त होतो.

४. कीर्तन या लोककलेवर आधुनिक समाजमाध्यमांचा परिणाम झालेला आहे.

**महत्वाचे मुद्दे**

महाराष्ट्र राज्यात कीर्तन ही लोककथा समाजावर सुसंस्कार करणारी, लोकप्रिय व महत्त्वाची असली तरीही व्यवहारिक दृष्ट्या या लोककलेचा पुढील मुद्द्यांच्या आधाराने अभ्यास करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे.

**१.कीर्तनकार :** कीर्तन ही लोककला प्रामुख्याने कीर्तनकाराच्या कीर्तनकलेवरील प्रभावावर तथा लोकप्रियतेवर अवलंबून असते. जेवढी कीर्तनकाराची लोकप्रियता अधिक, तेवढी कीर्तन ऐकणाऱ्या श्रोत्यांची संख्या जास्त असते आणि वरचेवर वाढणाऱ्या श्रोत्यांच्या संख्येवर कीर्तनकारांचे मानधन अवलंबून असते. कीर्तन या लोककलेचा परिणाम व्यावसायिकदृष्ट्या अनेक उद्योगांवर होत असला तरीही कीर्तनकार हा या लोककलेचा केंद्रबिंदू असतो. अनेक कीर्तनकार मानधनाची अपेक्षा न करता समाजप्रबोधन तथा अध्यात्मसेवा करण्यासाठी मिळेल ते मानधन स्वीकारतात. कीर्तनकारांचे मानधन निश्चितपणे सांगता येणे शक्य नसले तरीही कीर्तनकाराची लोकप्रियता, कीर्तनाचा प्रकार, कीर्तनाचे ठिकाण, कालावधी यांवर कीर्तनकाराचे मानधन ठरते.

**उदाहरण :**ग्रामीण व छोट्या कार्यक्रमांसाठी मानधन कमी असते, तर शहरी भागात व मोठ्या कार्यक्रमात, सप्ताहात जास्त मानधन अदा केले जाते.फारशी लोकप्रियता नसलेले स्थानिक कीर्तनकार २००० ते ५००० पर्यंत मानधन स्वीकारतात, तर ह.भ.प. निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्यासारख्या प्रसिद्ध कीर्तनकारांचे मानधन२५००० ते ५०००० पर्यंत असू शकते. थोडक्यात कीर्तनकाराचे मानधन हे त्यांच्या कामाचा मोबदला नसून त्यांच्या अध्यात्मसेवेबद्दल पूर्णपणे वैयक्तिक आणि कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार ठरते.

**२.गायक, वादक :** कीर्तन या लोककलेच्या माध्यमातून कीर्तनकाराच्याबरोबरच त्यांना गायन, वादन यांसाठी साथ देणारे मृदुंगवादक, टाळकरी,वीणेकरी यांना ही रोजगार प्राप्त होतो. महाराष्ट्रात गावोगावी अशा प्रकारचे टाळकरी, मृदुंगवादक,वीणेकरी यांचे समूह आढळून येतात. या संगीत वादकांचे मानधनही निश्चित नसले तरीही सामान्यपणे कीर्तनात सहभागी असणाऱ्या प्रत्येक अभंगगायक, टाळकरी, मृदुंगवादक, वीणेकरी यांना प्रत्येकी १००० ते २००० पर्यंत मानधन अदा केले जाते. कीर्तन या लोककलेमुळे अशा अनेक कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

**३.खाद्यपदार्थ, महाप्रसाद व पेये बनवणारे :** कीर्तन झाल्यावर महाप्रसादाचे आयोजन केले जाते. कार्यक्रमाच्या स्वरूपावर या स्वयंपाकाचे स्वरूप निश्चित होते. या प्रसादामुळे प्रसाद बनवणारे आचारी, त्यांच्या देखरेखीखाली काम करणारे इतर स्वयंपाकी यांना रोजगार प्राप्त होतो. प्रसादासाठी लागणारे किराणासाहित्य स्थानिक बाजारपेठेतून खरेदी केले जाते. त्यामुळे स्थानिक बाजाराला तेजी मिळते. आचारी, स्वयंपाकी यांचे मानधन हे महाप्रसादाचा लाभ घेणाऱ्या भाविकांच्या संख्येवर अवलंबून असते.

**४.धार्मिक पुस्तके व विक्री साहित्य :**कीर्तनामुळे कीर्तनात महती सांगितलेल्या धार्मिक कथांवरील पुस्तके, धार्मिक ग्रंथ, पोथ्या, व्रतवैकल्यांची पुस्तके, भजने, अभंगसंग्रह यांच्या विक्री साहित्याला चालना मिळते. अशी पुस्तके छपाई करणाऱ्या उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध होते. तसेच स्थानिक परिसरात बनणारे पूजासाहित्य, गंध, हार, फुले, तुळशीमाळा, चंदन, अगरबत्ती, धूप अशा पूजेच्या साहित्य विक्रीलाही प्रोत्साहन मिळते.

**५.संगीतसाहित्य व वाद्य व्यवसाय :** कीर्तन या लोककलेमुळे कीर्तनात महत्त्वाचे असणारे मृदुंग, तबला, पकवाज, टाळ, वीणा, झांजा यांसारखीवाद्ये बनविणे, विक्री करणे, दुरुस्ती करणे यांसारख्या व्यवसायांना बळ मिळते. स्थानिक वाद्यसाहित्य बनविणारे तथा दुरुस्ती करणाऱ्या कारागिरांना प्रोत्साहन मिळते.

**६.मंडप व ध्वनीव्यवस्था :** कीर्तन ग्रामीण भागात असो वा शहरी भागात,कीर्तनाला मंडप, बैठकव्यवस्था, ध्वनीव्यवस्था गरजेची असते. कीर्तनाच्या स्वरूपावरून या व्यवस्थेचे नियोजन केले जाते.कीर्तनामुळे मंडप, ध्वनीव्यवस्था करणाऱ्या उद्योगांना रोजगार उपलब्ध होतो.

**७.वाहतूक व्यवस्था :**गावोगावी कीर्तनाचा लाभ घेणाऱ्या श्रोत्यांची संख्या खूप जास्त आहे. दूरवर असलेल्या परगावीही श्रोते कीर्तनकाराला ऐकण्यासाठी प्रवास करतात. त्यामुळे परिसरात वाहतुकीचा व्यवसाय करणाऱ्या वाहनधारकांना रोजगार उपलब्ध होतो.

**८.प्रचार व जाहिरात व्यवसाय :** पुढील काही दिवसांत निश्चित असलेले कीर्तनाचे कार्यक्रम, सप्ताहाचे कार्यक्रम, त्यांचे स्थळ-काळनिहाय नियोजन प्रसिद्ध करण्यासाठी प्रचार व जाहिरात व्यवसाय सेवा देतात. सोशल मीडियावरील पोस्ट, कीर्तनाचे पोस्टर्स, बॅनर्स यांचा व्यवसायही उत्तम रीतीने चालतो.कीर्तनामुळे प्रचार व जाहिरात व्यवसायालाही उभारी मिळते.

## सर्वेक्षण

संत नामदेव, संत तुकाराम यांच्या काळापासून सुरू झालेली कीर्तन परंपरा पुढे संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज यांसारख्या आधुनिक संतांनी समाजप्रबोधनाच्या हेतूने चालवली. आताच्या काळात कीर्तन हा एक महत्त्वाचा व मोठा व्यवसाय म्हणून पुढे येत आहे. आजचे तरुण कीर्तनाकडे उत्तम रोजगाराची संधी म्हणून पाहत आहेत. अनेक संस्था कीर्तन-प्रवचन अभ्यास वर्गाचे प्रत्यक्ष तथा ऑनलाइन आयोजन करत आहेत. मुंबईतील दादर येथील **अखिल भारतीय कीर्तन संस्था** कीर्तन शिकवण्यासाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करते.**कीर्तनविश्व** या पुण्यातील संस्थेद्वारेही ऑनलाइन कीर्तनवर्गाचे चार महिन्यांच्या कालावधीत आयोजन केले जाते. या कीर्तन-प्रवचन वर्गासाठी २५००० रुपयांपर्यंत सहभाग शुल्क आकारले जाते.

## सोशल मीडिया

आजच्या आधुनिक काळात कीर्तनाचा प्रचार, प्रसार व जाहिरात करण्यासाठी सोशल मीडिया साधनांचा प्रभावीपणे वापर केला जातो. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम यांसारख्या लोकप्रिय समाजमाध्यमांवर कीर्तन प्रदर्शित केले जाते. अनेक कीर्तनकार त्यांचे स्वतःच्या समाज माध्यमांच्या अकाउंटवरून कीर्तन प्रदर्शित करतात. यामागेही आर्थिक मिळकतीचा हेतू असतो. इतर सर्व व्यवसायांबरोबरच कीर्तनाचे कार्यक्रमही यूट्यूबया लोकप्रिय समाजमाध्यमावर प्रसारित केले जातात. अनेक वारकरी संस्थांचे यूट्यूब या माध्यमावर अकाउंट आहेत. कीर्तनकाराच्यालोकप्रियतेवर त्यांचे चॅनेल नियमितपणे पाहणारे व ऐकणारे फॉलोअर्स आहेत. या फॉलोअर्सच्या यूट्यूबचॅनल वरील कीर्तन पाहण्याच्या वेळेनुसार चॅनलच्या धारणकर्त्याला यूट्यूबकडून रक्कम प्राप्त होते.

उदाहरण- **कीर्तनविश्व** या यूट्यूब चॅनलवर एका वर्षात आठवड्याला ३ असे एकूण **१५६** कीर्तने दरवर्षी प्रदर्शित होतात. ही कीर्तने पाहणाऱ्यांची संख्या लक्षणीय आहे. हे यूट्यूबचॅनल १ लक्ष पेक्षा जास्त लोकांनी सबस्क्राईब केलेले आहे.**मनमंदिरा** या कीर्तन प्रसारित करणाऱ्या यूट्यूबचॅनल पाहणाऱ्यांची संख्याही खूप आहे.**२.८५ लक्ष** लोकांनी हे चॅनल सबस्क्राईब केले असून **१०००** पेक्षा जास्त कीर्तनाचे व्हिडिओ या चॅनलवरून प्रसारित केलेले आहेत. यावरून कीर्तन हा व्यवसाय समाजमाध्यमांतूनही लोकप्रिय आहे व या माध्यमातूनही अर्थार्जन करण्याचा प्रयत्न केला जातो.

## चालू उदाहरणे

कीर्तन ही लोककला लोकप्रिय असल्याने विविध प्रकारे कीर्तनातून आर्थिक उत्पन्न मिळवण्याचा, रोजगार प्राप्तीचा प्रयत्न केला जातो. झी टॉकीज या मराठी वाहिनीवरूनही **मनमंदिरा-गजर भक्तीचा** या कार्यक्रमातून कीर्तनाचे कार्यक्रम प्रसारित केले जातात. झी टॉकीज या वाहिनीने कीर्तनाला टीव्हीवर आणून पारंपारिक कीर्तनाला आधुनिकतेची जोड दिली आहे. असे असले तरीही महाराष्ट्रात प्रेक्षकांना कीर्तनाची असलेली आवड पाहून झी टॉकीज ने कीर्तनाच्या कार्यक्रमातून जास्तीत जास्त प्रेक्षक वर्ग जोडला आहे.**मन मंदिरा-गजर भक्तीचा** या कीर्तनाच्या कार्यक्रमामुळे झी टॉकीज ही वाहिनी महाराष्ट्रात सर्वात जास्त वेळ पाहिली जाणारी वाहिनी झाली आहे असे आकडेवारी दर्शवते. या कीर्तनाच्या कार्यक्रमाला झी टॉकीज हे चॅनल विविध कीर्तनकारांना निमंत्रित करते. कीर्तनाचा मोबदला म्हणून कीर्तनकारांना मानधन अदा करण्यात येते. झी टॉकीज कडून कीर्तनकाराला किती मानधन दिले

जाते हे निश्चित नसले, तरी कीर्तनकाराच्या लोकप्रियतेनुसार हे मानधन दिले जाते. लोकप्रियतेनुसार १०००० ते १ लक्ष असे मानधन दिले जाते. मात्र या कीर्तनाच्या कार्यक्रमातून झी टॉकीज चॅनल व कीर्तनकार या दोघांचीही प्रगती साधली जाते. दोघांचीही प्रसिद्धी होऊन जास्तीत जास्त प्रेक्षक व श्रोता जोडला जातो हे या कार्यक्रमाचे आर्थिक गणित असते.

## शासनाला सूचना

कीर्तन ही लोककला महाराष्ट्रातील ग्रामीण भागात जास्त लोकप्रिय असली तरी सोशल मीडियामुळे शहरी भागातही कीर्तनाची लोकप्रियता वाढताना दिसत आहे. कीर्तनकाराच्या कीर्तनशैलीवर व श्रोत्यांवर टाकल्या जाणाऱ्या प्रभावावर, कीर्तनकाराच्या लोकप्रियतेवर त्यांचे मानधन ठरत असले तरीही कीर्तन या लोककलेकडे तरुणांचा कल वाढत आहे. अनेक युवा कीर्तनकार कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधन करताना दिसत आहेत. अनेक लोकप्रिय कीर्तनकारांचे मानधन जास्त असते. मात्र ग्रामीण भागात वर्षश्राद्ध, दहावे, तेरावे, छोटे हरिनाम सप्ताह यांसाठी लोकप्रिय कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करणे आर्थिकदृष्ट्या न परवडणारे असते, अशावेळी अत्यल्प मानधनावर स्थानिक परिसरातील कीर्तनकारांना आमंत्रित केले जाते. अनेक कीर्तनकारांच्या मानधनात खूपच आर्थिक तफावत दिसून येते.

कोरोनाच्या काळात जग ठप्प झाले. सर्वच व्यवसायांना या महामारीचा फटका बसला. कीर्तन ही लोककला सादर करणाऱ्या सर्वच यंत्रणेवरही आर्थिक परिणाम झाला. दिनांक १० सप्टेंबर २०२१ रोजी प्रसिद्ध झालेल्या दैनिक सकाळ मधील बातमीनुसार कोरोना काळात कीर्तन बंद असल्यामुळे रोजगार हिरावला गेलेल्या कीर्तनकार, प्रवचनकार, गायक, वादक अशा ४८००० कलावंतांना ५००० रुपये मानधन तत्कालीक ठाकरे सरकारकडून जाहीर झाल्याची बातमी प्रसिद्ध झाली.

तेव्हा शासनाकडून कीर्तनकलेशी संबंधित असणाऱ्या कलावंतांसाठी विशेष निकष निश्चित करून हे निकष पूर्ण करणाऱ्या कलावंतांना दरमहा त्यांचा उदरनिर्वाह भागेल या प्रकारचे शाश्वत मासिक मानधन देण्याची तरतूद व्हावी असे वाटते. शाश्वत मानधनामुळे कीर्तनकार व कीर्तनाशी संबंधित कलावंतांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होऊन समाज प्रबोधनाचे कार्य त्यांच्या हातून प्रभावीपणे घडेल. ज्या आधारे समाजावर नैतिक संस्कार रुजवले जाऊन सुसंस्कृत समाजाची निर्मिती होऊ शकेल.

## निष्कर्ष

वरील सर्व विवेचनाचा विचार करता असे स्पष्ट होते की, कीर्तन या लोककलेचा समाजाच्या अर्थव्यवस्थेवर प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष परिणाम होतो. कीर्तन हा केवळ व्यवसाय नसून समाजावर संस्कार करणारी, समाजाला दिशा देणारी कला आहे. असे असले तरीही कीर्तनाच्या माध्यमातून अनेक प्रकारे रोजगार निर्मिती होते. अनेकांचे उदरनिर्वाह चालतात. कीर्तनामुळे अनेक कीर्तनकारांना उपजीविकेचे साधन मिळते. अनेक वेळा कीर्तनाच्या आयोजनासाठी समाजातून लोकवर्गणी गोळा केली जाते. ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेसही चालना मिळते. बदलत्या काळासोबत कीर्तनाचे स्वरूप बदलताना दिसते. कीर्तन प्रभावी होण्यासाठी, कीर्तनाचा प्रचार व प्रसार होऊन श्रोत्यांची संख्या वाढवण्यासाठी आधुनिक सोशल मीडियाचा वापर होताना दिसतो. टीव्ही चॅनल, यूट्यूब,फेसबुक यांमुळे कीर्तन घराघरात पोहोचत आहे.

थोडक्यात, कीर्तन हे केवळ आध्यात्मिक नसून ते समाजाला एकत्र आणणारे, मार्गदर्शन करणारे आणि नैतिकदृष्ट्या सक्षम करणारे एक महत्त्वाचे सामाजिक माध्यम आहे. ज्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे समाजाच्या अर्थव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतो.

**संदर्भ**

१. मोघे पांडुरंग आबाजी व केमकर वामन एकनाथशास्त्री,कीर्तन तरंगिणी भाग दुसरा,मुद्रक व प्रकाशक गोंधळेकर प्रकाश रावजी, नववी आवृत्ती,१९९३.

२. मांडे प्रभाकर,लोकरंगभूमी परंपरा स्वरूप आणि भवितव्य, मधुराज पब्लिकेशन, पुणे, २००७.

३. पाठक यशवंत, कीर्तनपरंपरा एक लोकसाहित्याविष्कार, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, २००८.

४. पाटील प्रविण, 'कीर्तनकारांना सरकारकडून मिळणार पाच हजार मानधन', दैनिक सकाळ, दि.१० सप्टेंबर २०२१, पृ.क्र. ५.

- **Copyright & License:**

© Authors retain the copyright of this article. This work is published under the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY 4.0), permitting unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.